# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ७१४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २९/१०/२०१६

**१) शुल्लक कारणाने डोक्यावर काठीने मारुन जखमी केले . :–**

दिनांक २७/१०/२०१६ रोजी २१.३० वा. दर. यातील फिर्यादीचा आरोपी हा मुलगा असुन दिवाळी सनाचा मौसम असतांनी फटाका विक्रीचे काम करतात फटाक्याचा ऑर्डर पोहचविण्यास फिर्यादी हा जावुन मोटार सायकलने परत येत असता फटाक्याचे बॉक्स खाली जमिनीवर पडुन सिल लेबल फुटल्याचे कारणा वरुन आरोपीने फिर्यादी सोबत तोंडा तोंडी भांडण करुन प्लायऊडचे काठीने फिर्यादीचे डोक्यावर मारुन जखमी केल्याने फिर्यादी जितेश रामकृष्ण टेंभुर्णे वय २७ वर्ष, रा. सानगडी यांचे बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**२) अश्लिल शब्दात शिविगाळ करुन मारपीट केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २७/१०/२०१६ रोजी २०.०० वा. दर. यातील फिर्यादी ही आपल्या घरी हजर असतांना यातील आरोपीने तीचे घरी जाऊन दरवाज्याला थाप मारुन आत जाऊन फिर्यादीस अश्लिल शब्दात शिविगाळ करुन "तु बाहेर निघ तुझे पोर काय करतील" अशी धमकी देवुन गालावर थापड मारल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ४५२,२९४,५०६,३२३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भजने पो.स्टे. साकोली हे करीत आहेत

**३) अज्ञात वाहन चालकांच्या निष्काळजीने एक जखमी होवुन उपचारा दरम्यान मृत्यु. . :–**

दिनांक १८/१०/२०१६ रोजी २१.३० वा. दर. यातील मृतक सुशिल भाऊदास सोनवाने वय २५ वर्ष रा. सिव्हील वार्ड साकोली हा दि. १८/१०/२०१६ चे २१.०० वा. दर. सेंदुरवाफा साकोली कडे आपल्या मोटार सायकलने जात असता सेंदुरवाफा तलावा जवळ यातील अज्ञात आरोपी वाहन चालकाने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने निष्काळजीपने चालवुन मृतकचे मोटार सायकलला धडक दिल्याने मृतक हा जखमी झाल्याने त्यास उपचारा कामी ज्युनार हॉस्पीटल नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दि. १९/१०/२०१६ चे २०.०० वा. मरण पावल्याने पो. स्टे. धंतोली नागपुर येथे मर्ग क्र. ००/१६ क. १७४ जाफौचे कागदपत्र प्राप्त झाल्याने पो. स्टे. ला नंबरी गुन्हा नोंद करण्यात आला. तसेच पोलीस स्टेशन येथे कलम ३०४(अ) भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. वानखेडे पो.स्टे. साकोली हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक २८/१०/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायद्याखाली १०३ प्रकरणांची नोंद कण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०९ तसेच तिन सिटर वाहनांवरती ०६ केसेस व ईतर वाहनांवरती ८८ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(बी. आर. गाडे)
प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.